To bring the labourers working on daily wages/workchart establishment as per Kalelkar Award retrospectively on CRTE

रोजंदारी तसेच कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचा-यांना न्या. कालेलकर करारानुसार पूर्वलक्षी प्रभावाने रूपांतरीत अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबत.

20140509123535 3827

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
**शासन निर्णय क्र.** रूअआ-१५९६/२२८/सेवा-५,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक** - २८ नोव्हेंबर, २०००.

**प्रस्तावना :-**

सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग यामध्ये सन १९८६ पूर्वी व नंतर रोजंदारी/कार्यव्ययी आस्थापनेवर काम करीत असलेल्या आणि ज्यांनी सलग सेवेची पाच वर्षे पूर्ण केलेली आहेत अशा पात्र कर्मचा-यांना न्या. कालेलकर तडजोडीनुसार ते सलग पाच वर्षे पूर्ण केल्यानंतरच्या दिनांकास धारण करीत असलेल्या पदाच्या रूपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबतचा या तिन्ही विभागातील सुमारे ११,६३२ कर्मचा-यांचा एकत्रित प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या प्रस्तावाचा शासनाने संबंधित मान्यताप्राप्त कर्मचारी संघटनांशी चर्चा करून साधकबाधक विचार केला आणि आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

**शासन निर्णय :-**

सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग यामध्ये रोजंदारी/कार्यव्ययी आस्थापनेवर कार्यरत असलेल्या पुढील कर्मचा-यांना न्या. कालेलकर करारानुसार त्यांना कायमपणाचे फायदे देण्यासाठी त्यांच्या सलग सेवेची ५ वर्षे पूर्ण होण्याच्या दिनांकास ते सलग धारण करीत असलेल्या पदाच्या रूपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर पुढील अटींच्या अधिन राहून घेण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

(१) जे रोजंदारी/कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचारी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापर्यंत शासन सेवेत कार्यरत आहेत आणि ज्यांच्या सलग सेवेला उशिरात उशिरा दि. ३१/१२/९८ रोजी ५ वर्षे पूर्ण झालेली आहेत असे करारातील अटींची पुर्तता करणारे पात्र कर्मचारी,

(२) सन १९८६ पुर्वी व नंतर सेवेत लागलेल्या ज्या रोजंदारी/कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचा-यांना त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यामुळे शासकीय सेवेतून कमी करण्यात आले होते, तथापि ज्या कर्मचा-यांनी अशा कपातीविरूध्द न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत असा कर्मचा-यांपैकी,

(अ) ज्यांना न्यायालयाच्या निर्णयानुसार पुनःस्थापित करण्यात आलेले आहे.

(ब) कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ज्या कर्मचा-यांना शासकीय सेवेत पुनःस्थापीत न करता शासनाच्या वतीने वरिष्ठ न्यायालयात रिव्हीजन/अपील दाखल केले आहे. परंतु त्यावर निर्णय अजूनही प्रलंबित आहे.

(क) कनिष्ठ न्यायालयाचा अवमान होऊ नये म्हणून अशा निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या इराद्याने ज्यांना सेवेत पुनःस्थापीत करून अशा कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाविरूध्द शासनाच्या वतीने वरिष्ठ न्यायालयात रिव्हीजन/अपिल दाखल केले आहे व सदर रिव्हीजन/अपिल न्यायालयाने अजूनही अंतिमतः निकाली काढलेले नाही, अशा सर्व प्रकरणात त्यांच्या सेवेची पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना सुरूवातीस दिलेल्या नेमणुकीच्या पदावर किंवा तत्सम पदावर रूपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर पुढील अटींच्या अधिन राहून घेण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. अशा सर्व प्रकरणात समाविष्ट असलेल्या पात्र कर्मचा-यांना न्या. कालेलकर करारानुसार त्यांना कायमपणाचे फायदे देण्यासाठी त्यांनी त्यांच्या सलग सेवेची ५ वर्ष पूर्ण होण्याच्या दिनाकास त्यांना प्रथम नियुक्ती दिलेल्या पदाच्या किंवा तत्सम पदाच्या रूपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्यात यावे.

(१) ज्या कर्मचा-यांनी न्यायालयात दावे/रिव्हीजन/अपिल/अवमान याचिका दाखल केलेली आहे, अशा सर्व कर्मचा-यांनी वर नमूद केलेले सर्व प्रकारचे दावे विना अट मागे घेतल्यानंतर त्यांना रूपांतरित अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबतची कार्यवाही करावी.

(२) शासनानेदेखील काही प्रकरणी कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाविरूध्द रिव्हीजन/अपिल दाखल केलेले असेल तर असे अपील मागे घेऊन अशा प्रकरणामध्ये समाविष्ट असलेल्या कर्मचा-यांना रूपांतरीत अस्थायी आस्थापनेवर आणण्यात येईल.

शासनाच्या या निर्णयानुसार कर्मचा-यांना रूपांतरीत अस्थायी आस्थापनेवर आणल्यानंतर त्यांना न्या. कालेलकर कराराच्या तरतुदीनुसार अनुज्ञेय ठरणा-या वेतनवाढीतील फरकाचे विनियमन पुढीलप्रमाणे करण्यात येईल.

(१) संबंधित कर्मचा-यांना दि. १ सप्टेंबर, २००० पासून त्यांचे रूपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेचे आदेश निर्गमित दिनांकापर्यंतच्या वेतनवाढीतील फरकाची रक्कम (सर्व प्रकारच्या भत्त्यासहित) ही प्रत्येक कर्मचा-यांस त्यांचे नावे काढलेल्या धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल.

(२) कर्मचा-यांची रूपांतरित अस्थायी आस्थापनेवर नियमित नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून दि. ३१/८/२००० पर्यंतच्या वेतनवाढीतील फरकाची रक्कम (सर्व प्रकारच्या भत्त्यासहित) सन २००१-२००२ या आर्थिक वर्षापासून त्या-त्या वर्षाच्या जून महिन्यात संबंधित कर्मचा-याच्या भविष्य निर्वाह निधीत वार्षिक दहा (१०) समान हप्त्यात जमा करण्यात येईल व प्रत्येक हप्ता त्यांच्या भविष्य निर्वाह निधीत जमा झाल्यापासून तीन वर्षापर्यंत सदर रक्कम त्या कर्मचा-यास खात्यातून काढता येणार नाही.

(३) दि. १ सप्टेंबर, २००० पुर्वी जे कर्मचारी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले असतील अशा कर्मचा-यांना त्याचप्रमाणे जे कर्मचारी आता निधन पावले असतील अशा कर्मचा-यांच्या वारसांना, मात्र त्यांना अनुज्ञेय होणारी थकबाकीची संपूर्ण रक्कम सन २००१-२००२ या आर्थिक वर्षापासून पुढील ३ वर्षात समान वार्षिक हप्त्याने रोखीत देण्यात येईल.

(२) वर नमूद केलेल्या पदांबाबतीच्या रुपांतर [illegible] अनुज्ञेय असणार नाही व संबंधित कर्मचाऱ्यांकडून असा [illegible] मागणी करण्यात येणार नाही अशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र त्यांनी शासनाला सादर करणे बंधनकारक राहील.

(३) संबंधित विभागांनी या शासन निर्णयान्वये कर्मचाऱ्यांना वाढ, आर्थिक लाभ असा [illegible] लागणारा खर्च मंजूर अनुदानातून करावयाचा आहे.

(४) अन्य व्यक्तिगत तक्रारींबाबत गुणावगुणांच्या विचार करून उचित पातळीवर तद्नुषंगिक व प्रचलित नियमांच्या आधारे निर्णय घेण्यात यावा.

(५) या सर्वसमावेशक आदेशांच्या आधारे उपरोक्त तीनही विभागातील कर्मचाऱ्यांचे बाबतीत त्यांना रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर आणण्याबाबतचे स्वतंत्र आदेश काढण्याची कार्यवाही त्या-त्या विभागाने वित्त विभागाशी विचार विनिमय करून करावयाची आहे. असे आदेश काढताना कर्मचाऱ्यांचे सेवापट, नियुक्तीचे आदेश, त्यांनी धारण केलेले पदनाम, नामसूत्र हजेरीपट ( Nominal Muster Roll ) वगैरे पदांची क्षेत्रीय पातळीवर पडताळणी व छाननी करून संबंधित विभागाने लेखी आदेशाच्या आधारे वित्त विभागाशी विचारविनिमय करून हे आदेश स्वतंत्रपणे काढावयाचे आहेत.

(६) रुपांतरीत अस्थायी आस्थापनेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर, सदर आदेश कर्मचाऱ्यांस मान्य नसल्यास त्यांनी त्याबद्दलचे लेखी प्रतिवदन सर्वसाधारणपणे तीन महिन्यात करणे आवश्यक आहे.

(७) अस्थायी आस्थापनेवर रुपांतरीत झालेली पदे प्रथमतः दि. २८/२/२००१ पर्यंत किंवा संबंधित पदधारक ज्या दिनांकापर्यंत सेवेत असतील यापैकी जो प्रथम दिनांक असेल त्या दिनांकापर्यंत चालू ठेवण्यात येत आहेत.

(८) रोजंदारी/कार्यव्ययी आस्थापनेवरील पदे/कर्मचारी रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबतच्या करावयाच्या कार्यवाहीस संबंधित विभागाने लाक्षणिक मागणीच्या (Token Grants) माध्यमातून विधीमंडळाच्या निदर्शनास आणण्याची आवश्यक कार्यवाही करावयाची आहे.

(९) प्रस्तुत आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४२८/व्यय-५, दि. २०/११/२००० अन्वये मिळालेल्या सहमतीने काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्री. वि. नलावडे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव/खाजगी सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव/खाजगी सचिव,
मा. मंत्री (सा. बां.) (सार्वजनिक उपक्रम वगळून),
मा. मंत्री (सा. बां.) (सार्वजनिक उपक्रम),
मा. मंत्री (पाटबंधारे) (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे वगळून),

मा. मंत्री (पाटबंधारे) (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळ),
मा. मंत्री (ग्राम विकास व जलसंधारण विभाग),
मा. राज्यमंत्री (सा. बां.) (सार्वजनिक उपक्रम वगळून),
मा. राज्यमंत्री (सा. बां.) (सार्वजनिक उपक्रम),
मा. राज्यमंत्री (पाटबंधारे) (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे वगळून),
मा. राज्यमंत्री (पाटबंधारे) (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळ),
मा. राज्यमंत्री (ग्राम विकास व जलसंधारण विभाग),
इतर सर्व मा. मंत्री,
इतर सर्व मा. राज्यमंत्री,
मा. मुख्य सचिव,
मा. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
सचिव ( पाटबंधारे ), पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव (लाभक्षेत्र विकास), पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र (लेखापरीक्षा) मुंबई/नागपूर,
सर्व मुख्य अभियंते/अधीक्षक अभियंते/कार्यकारी अभियंते (विद्युतसह), सा. बां. विभाग,
संचालक, उद्याने व उपवने, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निवडनस्ती, सेवा-५ कार्यासन, सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रती

त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचा शासन निर्णय त्यांच्या विभागाखालील सर्व विभाग प्रमुख/
कार्यालय प्रमुख यांच्या नजरेस आणावा